सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्र. मजनिप्रा/आस्था/व्हिसी/२०२३/६९१ दिनांक : २८/१०/२०२६

विषय - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणाली बसविण्याबाबत...

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणाली खरेदी करण्यासाठी पात्र सेवापुरवठादारांकडून कंपनीच्या/संस्थेच्या लेटरहेडवर सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | व्हिडीओ कॉन्फरन्स प्रणाली तपशील | परिशिष्ट - २ मध्ये नमूद केला आहे. |
| २ | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १७/११/२०२६<br>वेळ : दुपारी ४ : ०० पर्यंत |
| ३ | दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. १७/११/२०२६<br>वेळ : दुपारी ५ : ०० वाजता कार्यालयाच्या पत्त्यावर |

२. दरपत्रक पाठवताना तांत्रिक व आर्थिक दरपत्रके वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये पाठविण्यात यावे.

**१) लिफाफा क्र. १ : तांत्रिक दरपत्रक** - यामध्ये संस्थेच्या लेटरहेडवर परिशिष्ट - १ नुसार कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

**२) लिफाफा क्र. २ : आर्थिक दरपत्रक** - यामध्ये संस्थेच्या लेटरहेडवर परिशिष्ट - २ नुसार व्हिडीओ कॉन्फरन्स प्रणालीचे दर नमूद करण्यात यावेत.

३. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणालीचे दर सर्व करांसह नमूद असावेत. सदरचे दर कराराच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहतील आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

४. परिशिष्ट - १ व २ मधील नमुन्यातच दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा ते ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच, अंतिम दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेली तांत्रिक व आर्थिक दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005. | Tel.: +91-22-69372000 / 22152019

५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांना कोणत्याही कारणाशिवाय दरपत्रके स्वीकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार राहतील.

६. ज्या संस्थांना, महाराष्ट्र शासनाने गैरव्यवहाराच्या कारणास्तव अपात्र (Blacklisted) ठरविले आहे अशा संस्थांना दरपत्रके भरता येणार नाहीत.

७. दरपत्रके भरणाऱ्या संस्थांना आपल्या संस्थेचे नाव, पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक देणे आवश्यक राहील.

८. दरपत्रकात नमूद केलेल्या किंमतीमध्ये वस्तू कर (Taxes), वाहतूक खर्च (Transportation charges) आणि संगणकाचे इन्स्टॉलेशन शुल्क (Installation charges) या सर्व शुल्कांचा समावेश असावा. यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च देय राहणार नाही.

९. सेवापुरवठादाराने दरपत्रकात १ वर्षाची मूळ (Standard) OEM वॉरंटी आणि ४ वर्षांची विस्तारित (Extended) OEM वॉरंटी स्पष्टपणे नमूद करावी. तसेच विस्तारित वॉरंटी अधिकृत सेवा नेटवर्कमार्फतच असावी.

१०. सेवापुरवठादाराने जेथे आवश्यक असेल तेथे परवान्यांचा (Licenses) तपशील अधिकृत असल्याचा पुरावा सादर करावा.

११. पायरेटेड, अनधिकृत किंवा विनापरवाना सॉफ्टवेअर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.

(सुनिल काळे)
सचिव, मजनिप्रा

F:\RSS\letter 2017.docx

<u>परिशिष्ट - १</u>

तांत्रिक दरपत्रक सादर करण्याकरिता प्रपत्र (दरपत्रक धारकाच्या लेटरहेडवर)

दिनांक: -- /--/२०२६

प्रति,
**सचिव,**
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
९ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर - १,
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

**विषय:- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणाली बसविण्याबाबत**

**संदर्भ:-** मजनिप्रा/आस्था/व्हिसी/२०२३/...., दि...../१०/२०२६.

**महोदय,**

मी/आम्ही उपरोक्त नमूद केलेले काम, दरपत्रक सूचनांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच दरपत्रक सूचनांमध्ये नमूद विनिर्दिष्ट कामाकरिता खालील कागदपत्रे सादर करीत आहे;

| तपशील | प्रमाणपत्र / प्रत |
|---|---|
| १) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ नुसार दुकानाची मुंबई येथील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. | सोबत जोडले आहे / नाही |
| २) कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र | सोबत जोडले आहे / नाही |
| ३) जी.एस.टी क्रमांकाची छायांकित प्रत. | सोबत जोडले आहे / नाही |
| ४) पॅन कार्डची छायांकित प्रत. | सोबत जोडले आहे / नाही |
| ५) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणाली पुरवठा क्षेत्रातील किमान १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र/आदेश. | सोबत जोडले आहे / नाही |
| ६) खरेदी प्राधिकाऱ्यांबरोबर हितसंबंधांचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल दरपत्रक सादर केल्याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर) | सोबत जोडले आहे / नाही |
| ७) घोषणापत्र - नमुन्याप्रमाणे | सोबत जोडले आहे / नाही |
| ८) कंपनी महाराष्ट्र शासनाने गैरव्यवहाराच्या कारणास्तव अपात्र (Blacklisted) | आहे / नाही |

| तपशील | प्रमाणपत्र / प्रत |
|---|---|
| ९) कंपनीचे नाव | |
| १०) कंपनीचा पत्ता | |
| ११) कंपनीचा दुरध्वनी क्रमांक | |
| १२) कंपनीचा ईमेल | |

आपला विश्वासू,

सोबत - वरीलप्रमाणे

दरपत्रक धारकाची सही व नाव

<u>परिशिष्ट - २</u>

आर्थिक दरपत्रक सादर करण्याकरिता प्रपत्र (दरपत्रक धारकाच्या लेटरहेडवर)

दिनांक: --/--/२०२६

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
९ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर - १,
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

विषय:- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणाली बसविण्याबाबत

संदर्भ:- मजनिप्रा/आस्था/व्हिसी/२०२३/...., दि...../१०/२०२६.

महोदय,

मी/आम्ही उपरोक्त नमूद केलेले काम, दरपत्रक सूचनांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच दरपत्रक सूचनांमध्ये नमूद विनिर्दिष्ट कामाकरिता अदा करावयाच्या देय रकमेचा विचार करून खाली दर्शविलेल्या दरानुसार खरेदी कार्यान्वित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहोत;

| Sr. No. | Name of the Item | Qty | Cost / quantity | Total Cost in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Professional 4K dual-lens PTZ video conferencing system featuring 12x optical zoom, panoramic AI camera with auto framing and speaker tracking, advanced beamforming microphones with 8m voice pickup, USB 3.0 connectivity, optional wireless/wired dongles, optional table microphone, and wireless USB-C BYOM/BYOD support. Ideal for Large and premium meeting spaces Includes 1 x USB C dongle - 1 Year Standard Warranty, Additional Extended Microphone and Extended 4 Year Warranty. | १ | | |
| 2 | Warranty and Garanty Charges | | | |
| 3 | Transportation Charges | | | |
| 4 | Installation Charges | | | |
| 5 | Other Charges (Specify) | | | |

| Sr. No. | Name of the Item | Qty | Cost / quantity | Total Cost in Rs. |
|---|---|---|---|---|
| 6 | Tax on above | | | |
| 7 | Grand Total | | | |

आम्ही दरपत्रक सूचनेतील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे नियम व कायदे वाचले असून ते आमच्यावर बंधनकारक आहेत.

आपला विश्वासू,

दरपत्रक धारकाची सही व (नाव)

# घोषणापत्र

मी [पूर्ण नाव], वय: [वय] वर्षे, राहणार: [पूर्ण पत्ता], याद्वारे अत्यंत जबाबदारीने खालीलप्रमाणे घोषणा करतो/करते की:

१. मी [तुमच्या व्यवसायाचे/कंपनीचे नाव] या संस्थेचा अधिकृत मालक/प्रतिनिधी आहे.

२. सोबत जोडलेल्या दरपत्रकामध्ये नमूद केलेले सर्व दर, माहिती, प्रमाणपत्रे आणि तपशील पूर्णपणे सत्य आणि अचूक आहेत.

३. या दरपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची चुकीची माहिती दिलेली नाही. भविष्यात यामध्ये काही बदल करायचा झाल्यास, त्याची पूर्वकल्पना दिली जाईल.

४. मी प्रमाणित करतो/करते की वरील माहितीमध्ये कोणतीही विसंगती आढळल्यास, त्याला मी वैयक्तिकरित्या जबाबदार राहीन.

ठिकाण: [शहराचे/गावाचे नाव]

दिनांक: DD/MM/YYYY

घोषणा करणाऱ्याची स्वाक्षरी:

___________________________

नाव: [तुमचे पूर्ण नाव लिहा]

पद/हुद्दा: [उदा. मालक / व्यवस्थापक]